नेहरू बाल पुस्तकालय

NEHRU BAL PUSTAKALAYA

# अमर पुस्तकें




म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा-वा
क्र. ११६३

BVBK-0401163

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

# अमर पुस्तके

मनोज दास
चित्रकार
सुकुमार चतर्जी
अनुवाद
सौ. श्यामला शिरोळकर





BVBK-0401163

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया
नवी दिल्ली

जुलै 1974 (शके 1895)

© मनोज दास, 1973

**रु. 1.50**

BOOKS FOR EVER *(Marathi)*

वितरक
**पॉप्युलर प्रकाशन**
35–सी, ताडदेव रोड, मुंबई 34, डब्ल्यू. बी.

प्रकाशक : संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए–5 ग्रीन पार्क, नवी दिल्ली
मुद्रक : धीरुभाई देसाई, स्टेट्स पीपल प्रेस, जन्मभूमि भवन, फोर्ट, मुंबई 1.
चित्रे व कव्हराची छपाई : इन्द्रप्रस्थ प्रेस, नवी दिल्ली.

# अमर पुस्तके

सुमारे दोन हजार वर्षापूर्वी सी वँग ती नावाचा एक चिनी राजा होऊन गेला. एका विचित्र कारणासाठी तो आपल्या प्रजेवर रागावला. ते कारण म्हणजे प्रजेला असलेलं वाचनाचं वेड ! सी वँग ती चे प्रजाजन उदंड वाचन करत. ज्यांना वाचता येत नव्हतं ते, वाचन करणारांजवळ बसून ऐकत. इतिहास, तत्त्वज्ञान आणि ललित साहित्य यांच्या पुस्तकातून फक्त आपले आणि आपल्या पूर्वजांचेच काय ते गोडवे गायिलेले आहेत याबद्दल सी वँग तीला खात्री वाटत नव्हती. शिवाय, कुणी सांगावं, खुद्द सी वँग तीवर टीका करणारे काही लेखक असण्याची शक्यता होती.

बस्. या शंकांनी हैराण झालेल्या सी वँग तीने एक निश्चय केला. कोणत्याही कारणासाठी लोकांनी पुस्तक वाचता कामा नये. वाचनाशी प्रजाजनांचा काही एक संबंध नाही. राज्यात शांती नांदायला हवी. ती एकाच तऱ्हेनं नांदू शकेल. लोकांनी वाचन करण्याऐवजी भरपूर काम करावं, राजाबद्दल निष्ठा दाखवावी आणि कर भरावे.

'असतील नसतील तेवढी पुस्तकं नष्ट करा'—राजाने फर्मावलं. त्या काळी आतासारखी सुटसुटीत, छापील पुस्तकं नव्हती. लाकडी ठोकळ्यांवर अक्षरं कोरून पुस्तकं तयार केली जात. ती अवजड लाकडी पुस्तकं लपवून ठेवणं सोपं नव्हतं. राजाचे नोकर गावा गावातून हिंडले. शहरन् शहरं त्यांनी पालथी घातली. हाती गवसली तेवढी पुस्तकं रचून त्यांची त्या नोकरांनी होळी केली. त्या सुमारास चीनची प्रचंड भिंत बांधण्याचं काम चालू होतं. मोठ्या वर्तुळाकार

लाकडी ठोकळ्यांवरील पुस्तकं त्या अजस्त्र बांधकामापर्यंत वाहून आणली गेली. दगडां ऐवजी त्या लाकडी पुस्तकांचा बांधकामात उपयोग केला गेला. काही चिनी पंडितांनी आपल्या जवळची पुस्तकं देण्यास नकार दिला. तर त्या पंडितांनाही त्यांच्या पुस्तकांसह त्या राक्षसी भिंतीत चिणण्यात आलं.

अशी काही वर्षं गेली. राजा सी वँग मृत्यू पावला. त्याच्या मृत्यूनंतर काही वर्षातच, चमत्कार घडावा तशी जाळलेली सगळीं पुस्तकं परत सर्वत्र दिसू लागली. लोकांनी नव्या लाकडी ठोकळ्यांवर सारी पुस्तकं पुन्हा एकदा लिहून काढली. त्या पुस्तकांमध्ये कॉन्फ्यूशस या महान चिनी तत्त्ववेत्याचीही पुस्तकं होती. ती आजही जगात सर्वत्र वाचली जातात.

पुस्तकं नाहीशी करण्याचा हा काही पहिला अन् शेवटचाच प्रसंग नव्हे.

सातव्या शतकात ह्यू एन् त्संग नावाचा प्रसिद्ध चिनी पंडित प्रवास करत करत भारतात आला होता. नालंदाच्या जगविख्यात विद्यापीठात बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी तो राहिला होता. एके रात्री ह्यू एन् त्संगला एक स्वप्न पडलं. नालंदा विद्यापीठातील सुंदर सुंदर इमारती नाहीशा झाल्या



असून, तेथील गुरुजन आणि
विद्यार्थ्यांऐवजी म्हशीच म्हशी
सर्वत्र आहेत असं ह्यू एन्
त्संगनं पाहिलं. त्याचं हे
दुःस्वप्न खरं ठरलं. भारतावर
आक्रमण करणाऱ्यांनी नालंदा
विश्वविद्यालयातील अजोड
ग्रंथालयाचे तीन विभाग जाळून
टाकले.

अलेक्झांड्रिया या प्राचीन
नगरीतही एक ग्रंथालय होतं.
त्या ग्रंथालयात देशोदेशीची
दुर्मिळ हस्तलिखितं होती.
भारता सुद्धा, जगातील प्रत्येक
देशाचे शेकडो लोक त्या
ग्रंथालयात अभ्यासासाठी जात.
सातव्या शतकात हे अमोल
ग्रंथालय जाणूनबुजून पेटवून
देण्यात आलं.





ज्या आक्रमकाने त्या ग्रंथालयाला 'आग्नये स्वाहा' केलं त्यानं आपल्या कृतीचं समर्थन विलक्षण तऱ्हेनं केलं. त्याची श्रद्धा असलेल्या 'पवित्र पुस्तका' पेक्षा निराळं काही जर त्या शेकड्यावरी पुस्तकांतून असेल तर ती पुस्तकं जपून ठेवण्यांत स्वारस्य नाही. आणि 'पवित्र पुस्तका'त आधीच सांगितलेलं जर त्या पुस्तकांतून असेल तर त्यांची निराळी जरुरीच नाही.


अशा तऱ्हेनं खूप वेळा पुस्तकांचा विध्वंस झाला. पण जी पुस्तकं नाहीशी झाली किंवा नष्ट केली गेली असं वाटलं ती पुन्हा जुन्या नव्या स्वरुपात लोकांसमोर आली. अखेर मानवाची बुद्धिमत्ता, जाणीव, ज्ञान, अनुभूती, कल्पनाशक्ती आणि अदृष्ट पाहण्याची शक्ती यांचा एकत्रित मिलाफ म्हणजे पुस्तकं होत. म्हणून पुस्तकं नष्ट केली गेली तरी मानवातील या गुणांचा लोप झाला नाही. दुसऱ्या शतकात बेन जोसेफ अकीवा या नावाचा एक डॅनिश धर्मगुरु होऊन गेला. त्यानं 'शहाणपणानं कसं वागावं' या विषयावर एक पुस्तक तयार केलं. त्याला त्या पुस्तकासह जिवंत जाळण्यात आलं. त्यावेळी त्यानं अखेरचे उद्‌गार काढले ते सदैव लक्षात ठेवण्यासारखे आहेत "कागद जळतो. शब्द मात्र न जळता चहूकडे फैलावतात."

स्वत:च्या जिवापेक्षाही पुस्तकांवर जास्त प्रेम करणारे लोक आहेत. प्रसंगी जीव धोक्यात घालूनही ते आपली आवडती पुस्तकं जपतात. आपल्या हिंदु धर्मात असा विश्वास आहे की एकदा जगबूड निर्माण झाली अन् पृथ्वी पाण्याखाली जाऊ लागली. देवाला पुस्तकांचं विलक्षण प्रेम असल्यानं त्यानं मत्स्यरूप घेतलं अन् वेद वाचवले. दुसरे असेही लोक असतात की त्यांचं आवडतं पुस्तक हरवल्यावद्दल त्यांना वाईट वाटत नाही. कारण त्या पुस्तकातील वाक्यन् वाक्य त्यांच्या स्मरणात असतं.

सबंध पुस्तक पाठ करून ठेवायची प्रशंसनीय पद्धत जुन्या काळी रूढ होती. ख्रिस्तपूर्व नऊशे वर्षं होमर हा महान ग्रीक कवी होऊन गेला. इलियड आणि ओडिसी ही दोन महाकाव्यं त्यानं रचली. ती दोन्ही महाकाव्यं मुखोद्‌गत करून गाऊन दाखविणारे लोक पिढ्यान् पिढ्या महाकाव्य गायनाचा पेशा करत होते.

त्या दोन्ही महाकाव्यात मिळून 28,000 ओळी आहेत. काही गायकांचं पाठांतर त्याच्या चौपट होतं.

स्मरणशक्तीच्या या देणगीच्या संदर्भात मनासमोर येतात वेद! भारतातील, इतकंच नव्हे तर काहींच्या मते जगातील, सर्वात पहिली पुस्तकं म्हणजे वेद.



शतकानुशतकं वेदातील ऋचांचं लेखन झालं नव्हतं. पिता मुलाला किंवा गुरु शिष्याला त्या तोंडीच शिकवत असे.

वेदांची रचना प्राचीन संस्कृतमधून केलेली आहे. भारतात जरी अनेक भाषा प्रचलित होत्या तरी जुन्या काळी भारतभर प्रामुख्याने, संस्कृतमधूनच देवघेव होई. भारताच्या विविध प्रदेशातील कवी आणि पंडितांनी संस्कृतमध्ये लेखन करून भारतीय साहित्य समृद्ध केलं आहे.

प्राचीन भारतातील तत्वज्ञान आणि शास्त्रं यांचा प्रसार दूरदूरच्या देशात झाला. त्यांच्याबरोबरच कथासरित्सागर, पंचतंत्र आणि जातकं यांच्यासारखी भारताच्या अनमोल कथाभांडारातील अनेक रत्नं उंच हिमालय आणि अथांग सागर पार करून दूरपर्यंत जाऊन पोहोचली. युरोपातील देशोदेशीच्या कथाकारांनी आपापल्या कथांसाठी भारतीय कथांचे आधार घेतले. खुद्द बायबलमधील दृष्टांत कथा, ग्रीस देशातील इसापच्या नीतिकथा, जर्मनीच्या ग्रिम बंधूंनी संकलित केलेल्या लोककथा किंवा डेन्मार्कच्या हॅन्स ॲण्डरसनने सांगितलेल्या कथा, या सर्वांचे मूळ भारतीय कथा आहे हे सर्वश्रुत आहे.

भारताचं प्राचीन साहित्य हा खरोखरच अमोल ठेवा आहे. प्रस्तुत पुस्तक म्हणजे त्या बहारदार ठेव्याकडे बघण्याची एक छोटीशी खिडकी आहे. आत्ता मी ज्या काही पुस्तकांची ओळख करून देणार आहे त्या खेरीजही काही अमोल ग्रंथ आपल्या भारतात आहेत. गीता, योगवासिष्ठ, त्रिपिटक, धम्मपद, ग्रंथसाहेब, ज्ञानेश्वरी हे ते ग्रंथ होत. तुम्ही जसजसे मोठे व्हाल तसेतसे या ग्रंथांच्या सन्निध जाल. आणि त्या अजोड ग्रंथांचे परिशीलन करून अननुभूत आनंद मिळवाल.

# वेद


परमात्मा, परमसुख, सत्य या सर्वोच्च गोष्टी म्हणजे नेमकं काय हे जाणण्याचा प्रयत्न आणि त्या प्रश्नांच्या संदर्भात मानवाला मिळालेले निष्कर्ष याचं विवेचन म्हणजे वेद होत.

पुष्कळ काळापर्यंत वेदांनाच श्रुती म्हणण्याचा प्रघात होता. ऐकू येणारे जे, ते म्हणजे श्रुती, असा वरवर पाहता श्रुतींचा अर्थ होतो. परंतु श्रुतींचा त्याहूनही मोठा अर्थ म्हणजे 'अंतिम सत्य' हा होय. प्राचीन ऋषींना त्यांच्या तपस्या कालात परमात्म्यानं वेदांचं ज्ञान दिलं अशी आपली श्रद्धा आहे. पुराणं, प्राचीन कथा आणि इतरही प्रसिद्ध कथांतून वसिष्ठ, विश्वामित्र, अत्रि, पाराशर, कण्व आणि मधुच्छंद या ऋषींचा संदर्भ येतो. त्यामुळे त्यांची नावं आपल्या चांगल्याच परिचयाची आहेत. त्याही पेक्षा भारतातील वहुतांशी कुटुंबं स्वतःला कोणत्या ना कोणत्या ऋषीच्या गोत्राची समजतात. म्हणून वेदाच्या लेखकांशी आपलं चांगलंच साहचर्य आहे.

शरीर आणि मन याखेरीज मानवाला आणखी एक अंतर्मन असतं अशी वेदकालीन ऋषींची श्रद्धा होती. त्यालाच ते 'आत्मा' किंवा 'आत्मन्' संबोधत. त्या आत्म्याचा शोध घेणं म्हणजेच स्वतःला खरंखुरं जाणणं होय. जो अशा तऱ्हेनं आत्म्याचा शोध घेई तोच मनुष्य ऋषी किंवा ज्ञाता होई. जर त्याला वाटलं तर इतरानांही आत्मज्ञान प्राप्त करून देण्यात तो मदत करी. ऋषीभोवती, जमिनीवर, गोलाकारात वसलेल्या शिष्यांना, ऋषीकडून ऋचांची संथा मिळे.

दिवसाचे कित्येक तास ते शिष्य वेदांतील ऋचा एकापाठोपाठ एक अशा पद्धतीने पाठ करत.

वेदांमधून कुठल्याही धर्माची वा तत्त्वाची शिकवण दिलेली नाही. ऋषींना चिंतनात आलेल्या दिव्यानुभवांची ती नोंद आहे. आपण एखाद्या दूरच्या ठिकाणी जाऊन आल्यावर वा पर्वतारोहण केल्यावर प्रवासवृत्त लिहावं इतकी ती साधीसुधी अनुभूती वा तिची नोंद नाही. ऋषींनी तपःसाधनेत प्राप्त केलेलं ज्ञान इतकं उच्च दर्जाचं, सखोल आहे की ते नेहमीच्या पद्धतीनं मांडताच येणार नाही. त्यांनी वेदात वापरलेली भाषा रूपकात्मक आहे. वेदातील शब्दांना प्रचलित अर्थापेक्षा अधिक गूढ अर्थ आहे असंच म्हटलं पाहिजे.



ही दोन उदाहरणं पहा: 'उषा' म्हणजे पहाट. परंतु 'उषा' या शब्दाला वेदात अधिक खोल अर्थ आहे. माणसाच्या मनावरील अज्ञानांधकार दूर करण्यासाठी, दिव्य प्रकाश आणते ती देवता म्हणजे 'उषा' असा वेदांतील अर्थ आहे. दुसरं उदाहरण अग्नीचं– ज्याचा अर्थ विस्तव असा आहे. पण वेदातील अग्नि नुसताच भक्षक किंवा शुद्ध करणारा नाही. कुणालाही सत्याकडे नेणारं चैतन्य, इच्छाशक्ती आणि मनःसामर्थ्य म्हणजे अग्नि होय.

महान साक्षात्कारी कवी व्यास मुनींनी वेदांचे चार विभाग केले– ऋक्, यजुः, साम आणि अथर्व. चारही वेदात वेगवेगळ्या देवतांच्या स्तुतीपर अनेक

स्तोत्रं आहेत. त्या खेरीज निरनिराळ्या यज्ञयागप्रसंगी आचरावयाच्या विधींच, उत्सवांचं गद्य विवरण आहे. त्याचबरोबर गूढ, तात्त्विक चिंतनातील अत्युच्च वैचारीक स्थितीचं दिग्दर्शनही वेदात आहे.

वेद केव्हा लिहीले गेले ? या प्रश्नावर अनेकांनी अनेक मतं दिली आहेत. त्यापैकी नक्की कोणतं मत बरोबर आहे हे सांगणं कठीण आहे. पुष्कळशा



पंडितांच्या मते. वेद ख्रिस्तपूर्व 2500 वर्ष लिहीले गेले. परंतु बॉनमधील एच्. जॅकोबी किंवा लोकमान्य टिळक यांच्या सारख्या काहींच्या मते वेद 6000 वर्षापूर्वी लिहीले गेले. वेदात वर्णन केलेल्या ग्रहस्थितीचा अभ्यास करून लोकमान्यांनी आपलं मत मांडलं आहे. मादाम ब्लावाटस्की या दुसऱ्या विदुषीनं आपलं वेगळं मत मांडताना असं म्हटलं की वेदात वर्णिलेली ग्रहस्थिती दर सहा हजार वर्षांनी पुन्हा येते. असं जर असेल तर वेद 60,000 वर्षापूर्वी लिहिले गेले नसतील हे कशावरून ? मादाम ब्लावाटस्कीच्या मते वेद फार फार प्राचीन काळी लिहीले गेले.

शास्त्रीय शोधानुसार मनुष्य प्राण्याची उत्पत्ति अलिकडची असली तरी भारतीय परंपरेनुसार मानवाची उत्पत्ति फार प्राचीन काली झालेली आहे. पुराणात असं वर्णन आहे की एकदा सर्व चराचर सृष्टी पृथ्वीवरील प्रलयामुळे नष्ट झाली. त्या महाभयंकर प्रलयात भगवान विष्णूंनी पाण्यात प्रवेश केला. आणि वेद वाचवले.



कोणत्याशा प्राचीनतम काळी अस्तित्वात असलेल्या मानवी संस्कृतीचा पुरावा म्हणजे वेद होत हे या पौराणिक कथेवरून सूचित होतं का ?

वेदांचं लेखन व्हायच्या अगोदर कितीतरी कालापर्यंत एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला ते तोंडीच सांगितले जात. ज्या भाषेत वेद रचले आहेत ती फार प्रगत भाषा आहे अगदी मोजक्या शब्दात फार मोठा अर्थ सांगण्याचं सामर्थ्य ती मधे आहे. भारतात प्रदीर्घ काळापर्यंत ती भाषा वापरात असावी. त्यामुळे ती एवढी प्रौढ, भारदस्त बनली आहे. महान् संस्कृती अस्तित्वात असेल तरच भाषा प्रगत होऊ शकते.


ज्या काळी वेद निर्माण झाले त्या काळच्या संस्कृतीबद्दल एक ना एक दिवस आपल्याला अधिक माहिती होईल अशी आशा करू या. साक्षात्कारी पुरुषाइतकं ज्ञान ज्याला प्राप्त होईल त्यालाच वेदातील ऋचांचा अर्थ समजेल असं वेदात म्हटलं आहे. तेव्हां खऱ्या खुऱ्या अर्थानं त्यांचा अर्थ एक दिवस आपणालाही समजेल असं मानू या.



# उपनिषदं

प्राचीन काळी वाच:श्रवस नावाच्या विख्यात ऋषींनी एक वेगळ्याच प्रकारचा यज्ञ केला. तो यज्ञ विधी करणारानं आपलं धन आणि एकूण सर्व चीजवस्तू ब्राह्मणांना, सत्पात्र व्यक्तींना आणि गरीबांना दान द्यावयाच्या असत.


वाच:श्रवस ऋषींना नचिकेता नावाचा एक मुलगा होता. ज्या अर्थी



आपल्या पित्यानं सर्वच वस्तु दान केल्या आहेत त्या अर्थी त्यांनी आपल्यालाही कुणाला तरी देऊन टाकलं असणार असा नचिकेतानं विचार केला.

वाच:श्रवस जमलेल्यांना आपली संपत्ती दान करून टाकण्याच्या गडबडीत असतानाच नचिकेता त्यांच्याजवळ गेला आणि म्हणाला, "तात, मला तुम्ही कुणाला देऊन टाकलंत ?"

ऋषींनी यावर काहीच उत्तर दिलं नाही. नचिकेता तोच तोच प्रश्न पुन्हा पुन्हा विचारू लागला. त्यामुळे



वाच:श्रवस ऋषी संतप्त झाले. रागाच्या तिरीमिरीतच ते खेकसले– "जा. तुला मी यमाला देऊन टाकलं आहे."

यम म्हणजे महाभयंकर मृत्यूदेवच. त्यामुळें वाच:श्रवसांच्या तोंडून निघालेल्या शब्दांचं जमलेल्या सगळ्यांना आश्चर्य वाटलं. खुद्द वाच:श्रवसही चकीत झाले. ऋषींच्या शब्दांनी एकटा नचिकेता काय तो विचलित झाला नाही. "मला मृत्यू यावा असं माझ्या वडलांना वाटण्यासारखं मी काहीच केलं नाही. मी यमधर्माच्या भेटीला जावं अशी कदाचित दैवाचीच योजना असेल" नचिकेतानं विचार केला.

यमधर्माच्या राज्यात जायची त्यानं तयारी केली. वाच:श्रवस आणि तिथं जमलेल्या सर्वांनीच त्याला परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. "नाही. मला गेलं पाहिजे. यमधर्माला भेटलं पाहिजे" नचिकेतानं ठामपणे आपला निश्चय जाहीर केला. आणि तो आपल्या प्रवासाला निघाला.




नचिकेता यमधर्माच्या राज्यात पोचला तेव्हा यम तिथं नव्हता. तीन दिवस, तीन रात्री, अन्नपाण्याविना, यमधर्माची वाट पाहात नचिकेता वसून राहिला. यम आला. नचिकेताचं धाडस, नचिकेताचा निश्चय पाहून प्रसन्न झालेला यम म्हणाला, "तीन दिवस, तीन रात्री कष्ट सोसत तू माझी वाट पाहिलीस. त्याबद्दल मी तुला

तीन वर देतो. तुला काय हवं ?"

"मी घर सोडल्यानंतर माझ्याबद्दल माझ्या वडलांना फार काळजी, दुःख वाटत असणार. हे मृत्यूदेवते, त्यांना त्यांची मन:शांती परत लाभेल असा वर दे" नचिकेता उत्तरला.

"ठीक आहे" यम म्हणाला.

जिथं वार्धक्य आणि मृत्यू यांचं भय नाही असा स्वर्गलोक प्राप्त करून घेण्याचं रहस्य कोणतं याबद्दल नचिकेतानं दुसरा वर मागितला. यमानं आनंदानं तोही वर दिला.



शेवटी नचिकेतानं विनवलं "देवा, मृत्यूचं गूढ ज्ञान तू मला समजावून सांग. मृत्यूनंतर मानवाचं काय होतं ? एखादा अमरपदी कसा पोचेल ?"

या प्रश्नानं मात्र यम चांगलाच अडचणीत सापडला. मृत्यूविषयीचं ज्ञान आतापर्यंत अत्यंत गुप्त ठेवण्यात आलं होतं. एक परमेश्वर आणि दुसरा तो स्वत: याखेरीज ते ज्ञान कुणालाही माहित नव्हतं. यमानं नचिकेताला दुसरा एखादा वर मागायला सांगितलं. 'संपत्ती, सत्ता, राज्य' या पैकी काही त्यानं मागावं असं सुचवलं. परंतु या प्रलोभनांना नचिकेता बळी पडला नाही. मृत्यूसंबंधीचं गूढ ज्ञान आणि अमरत्वाला पोचण्यासंबंधीचं रहस्यच त्याला जाणून घ्यायचं होतं.

या गूढ गोष्टी जाणून घ्यायची नचिकेताची जिज्ञासा पाहून यम आश्चर्यचकित झाला. त्याला नचिकेताची जिज्ञासा पूर्ण करावी लागली. आत्म्याविषयी, आत्मज्ञानाविषयी माहिती करून घेण्यातील अडचण यमधर्मानं नचिकेताला ज्ञात करून दिली. कारण एकदा त्याला आत्मज्ञान प्राप्त झालं की त्याच्या ध्यानात येईल की मृत्यू हा एक भास आहे. एक पडदा आहे. एक जन्म संपताना देह नष्ट होतो. त्याचा आत्मा, अन्तरात्मा कधीच नष्ट होत नाही.

उपनिषदातून नचिकेताची ही कथा घेतली आहे. प्राचीन काळी ज्ञानप्राप्ती करण्याची धडपड करणारे जे निग्रही लोक होऊन गेले त्यांची ओळख उपनिषदांच्या पानोपानी आपल्याला होते.

प्राचीन काळी आपल्या देशात रूढ असलेल्या उत्कृष्ट शिक्षणपद्धतीचं दर्शन आपल्याला उपनिषदातील कथात जागोजाग आढळतं. वनात राहणाऱ्या गुरुजवळ शिष्य कोणत्याही जाचक निर्बंधाशिवाय राही. अभ्यासावर तो आपले सर्व लक्ष केन्द्रीत करी. केवळ धर्मग्रंथांचा अभ्यास करण्यापुरता त्याचा अभ्यास मर्यादित नसे. ध्यानधारणा, योगाभ्यास आणि शारीरिक कष्टांची कामं यांचाही अंतर्भाव त्याच्या शिक्षणात होता.

भारतीय वाङ्मयाच्या तेजस्वी वारशात वेदाखालोखाल उपनिषदांनाच महत्वाचं स्थान आहे. उपनिषदांना पुष्कळसे विद्वान वेदांचाच एक भाग

समजतात. कारण उपनिषदांना 'वेदान्त'—'वेदांचा अंत' असं समजण्यात येतं. वेदातील काही कल्पनांची स्पष्टीकरणं म्हणजे उपनिषदं असं म्हणणं अधिक योग्य होईल. प्रत्येक उपनिषदातील विषय कोणत्या तरी वेदाशी निगडीत आहे वैदिक कालाच्या अखेरीस बऱ्याचशा उपनिषदांची रचना झाली. त्यानंतर बराच कालखंड गेल्यावर आणखी काही उपनिषदं रचली गेली. सर्व मिळून 108 उपनिषदं आहेत. त्यापैकी ईश, केन, कठ, मांडुक्य मौण्डुक्य, आणि प्रश्न ही उपनिषदं महत्त्वाची आहेत.

"आत्मज्ञान मिळवा" हा वेदांचा, उपनिषदांचा सर्वसामान्य संदेश आहे. पण आत्मज्ञान मिळवणं फार कठीण आहे. म्हणूनच उपनिषदात म्हटलं आहे—


"काहींच्या कानी आत्म्याविषयी एकही शब्द पडत नाही. काहींच्या कानी आत्मज्ञानाविषयी गोष्टी पडूनही त्यांना त्या समजत नाहीत. आत्मज्ञानाबद्दल बोलणाऱ्याचं कौतुक मात्र वाटतं. आत्मज्ञानाची माहिती करून घेणारा बुद्धिमान ठरतो. तर चांगल्या गुरुजवळ राहून आत्मज्ञान प्राप्त करून घेणारा भाग्यवान् ठरतो."

उपनिषदकर्त्यांखेरीज हे ज्ञान चांगल्या तऱ्हेनं कोण देऊ शकणार ? त्यांनी स्पष्टपणे, ठामपणे याचे रहस्य समजावलं आहे. आपण एक उदाहरणच घेऊ :

राजा जनक आणि महान् द्रष्टे ऋषी याज्ञवल्क्य यांच्यात एकदा तत्त्वज्ञानविषयक चर्चा चालली होती. ऐहिक गोष्टीत रमणारा असूनही राजा जनक अतिशय हुशार आणि विद्वान् होता. चर्चेच्या अखेरी प्रसन्न झालेल्या याज्ञवल्क्य मुनींनी राजाला एक वर देऊ केला.

राजानं आयुष्यभर धर्मग्रंथांचा अभ्यास केला होता. त्यांवर मनन, चिंतन केलं होतं. परंतु त्याची ज्ञानलालसा कधीही तृप्त झाली नव्हती. अधिक ज्ञान मिळावं म्हणून त्यानं याज्ञवल्कांना खालील प्रश्नाचं उत्तर द्यायची विनंति केली.

"मुनी याज्ञवल्क्य," राजा नम्रपणे म्हणाला, "मानवाचा खराखुरा प्रकाश कोणता ?"



"राजन्. सूर्य हाच प्रकाश" याज्ञवल्क्य उत्तरले. "कारण त्याच्या दीप्तीमध्ये मनुष्यमात्र पाहतो, काम करतो, घरी परततो"

"ते खरं आहे. मुनिवरा !" वैदेहराज जनक उद्गारला, "परंतु जेव्हा सूर्यास्त होतो, तेव्हा मानवाला कोण प्रकाश देतं ?"

"तेव्हा चंद्र त्याला प्रकाश देतो" याज्ञवल्क्य उत्तरले. "कारण त्याच्या किरणांमुळे मनुष्याला आजुबाजूचं दिसतं, तो काम करतो. घरी परततो"

"तसं असेलही मुनिश्रेष्ठा !" वैदेहराज जनक म्हणाला, "पण जेव्हा सूर्यही नाही, आणि चंद्रही नाही, अशा वेळी मानवाला कोण प्रकाश देतं ?"

"अग्नि. राजर्षे !" याज्ञवल्क्य उत्तरले. "त्याच्या उजेडात मनुष्य पाहू शकतो. काम करू शकतो. घरी परतू शकतो"

"तेही शक्य आहे-महामुने !" विदेहराजा जनक उद्गारला. "परंतु जेव्हा सूर्यास्त झालेला आहे, चंद्रमाही अस्तंगत झाला आहे, अग्नि विझला आहे, तेव्हा मानवाचा प्रकाश कोणता ?"

"वाणी हाच त्याचा प्रकाश. कारण वाणीच्या सहाय्यानं मनुष्यमात्र प्रत्येक गोष्ट समजू शकतो. हे नृपते, म्हणूनच जेव्हा मनुष्यमात्राच्या दृष्टीला त्याचा स्वत:चा हातही पडत नाही तेव्हा त्याच्या कानी पडणाऱ्या वाणीच्या दिशेनं तो जातो."



"याज्ञवल्क्य तपोनिधी, वाणीबद्दल आपलं म्हणणं योग्यच आहे. परंतु मला आणखी असं विचारायचं आहे" जनक राजा म्हणाला, "जेव्हा सूर्य, चंद्र, अग्नि लोप पावलेले असतात आणि वाणीही नि:शब्द बनलेली असते तेव्हा मानवाला कोण प्रकाश देतं ?"

"आत्मा हाच त्याचा प्रकाश बनतो" याज्ञवल्क्य उत्तरले.

म. ग्रं. सं. ठाणे, ... शाखा.
... विभाग
दा. क्र ११६३
विषय बा-वा क्र. ५१९.



# रामायण

पवत आणि झरे यांनी वेढलेलं दंडकारण्य नावाचं महारण्य फार पूर्वीपासून आजपावेतो अस्तित्वात आहे. त्याचा उल्लेख असंख्य, जुन्या पुस्तकातून आला आहे. गोदावरी आणि नर्मदा या दोन नद्यांच्यामधे विस्तारलेलं दंडकारण्य प्राचीन काळी फारच मोठं होतं.

दाट जंगलात गालिचाप्रमाणे पसरलेल्या तपकिरी आणि पांढऱ्या दगडांवरून हलके हलके उड्या मारणारी, आपल्या पाण्याचा मधुर खळखळाट करणारी तमसा नदी आजही पाहू गेलं तर दिसते.


तीन हजार वर्षांपूर्वी तमसा नदीच्या तीरी एक महान् ऋषी राहात होते. वर्षानुवर्षं कठीण तप:साधना करण्यात ते मग्न होते. त्यांची तपस्या चालू असता ते इतके अविचल बसून राहिले की त्यांच्या अवतीभवती मोठमोठी मुंग्यांची वारूळं वाढली. मुंग्याच्या वारूळाला संस्कृतमध्ये 'वाल्मिक' असा शब्द आहे. तपश्चर्येची पूर्ती झालेले ते ऋषी मुंग्यांच्या वारूळातून बाहेर आले म्हणून ते 'वाल्मिकी' या नावानं ओळखले जाऊ लागले.

एके दिवशी तमसेवर स्नान करून ते ऋषी आपल्या आश्रमाकडे परतत होते. वाटेने पक्ष्यांची एक सुंदर जोडी आपसात खेळत, एकमेकांचा पाठलाग करत जाताना त्यांनी पाहिली. त्या पक्ष्यांचा खेळ अवलोकण्यासाठी वाल्मिकी थबकले. इतक्यात कुठूनसा एक बाण सूं सूं करत आला. आणि त्या पक्ष्यांपैकी एकाच्या शरीरात घुसला. पक्षी तात्काळ मरून पडला. त्या पक्ष्याच्या विरहाने व्याकूळ झालेला दुसरा पक्षी आर्त, केविलवाण्या स्वरात ओरडू लागला.



त्या दृश्याने क्रोधायमान् झालेले वाल्मिकी थरथर कापू लागले. त्या करुण दृश्यामुळे, भावनावेगात त्यांच्या तोंडून शब्द बाहेर पडले. त्या शब्दांनी फक्त पारध्याची निर्भत्सना केली असं नव्हे तर एकूणच माणसानं कसं वागावं याविषयी सांगितलं.

जेव्हा त्यांचा राग शांत झाला, तेव्हा वाल्मिकींना असं जाणवलं की ज्या छंदात ते पारध्याला बोलले तो छंद सर्वस्वी नवा आहे. एका वेगळ्या विषयावर एक पुस्तक लिहायचं त्यांनी ठरवलं होतं. त्या विषयाची रचना सर्वस्वी नव्या स्वरूपात व्हावी असं गेले कित्येक दिवस त्यांना वाटत होतं. ज्या छंदात अभावितपणे ते शब्द उच्चारले गेले तो छंद नव्या विषयाच्या अभिव्यक्तीला पुरेपूर न्याय देईल असं त्यांना वाटलं.



अशा तऱ्हेनं पारध्याला उद्देशून उच्चारलेले शब्द काव्याचा एक नवा प्रकार म्हणून ओळखले गेले. वाल्मिकी हे आपले आद्य कवी किंवा 'आदि कवी' होत. संस्कृतमध्ये त्यांनी रचलेलं महान् काव्य— 'महाकाव्य' हेच भारतीय वाङ्मयातील पहिलं खरंखुरं महाकाव्य होय.

रामायण हेच ते महाकाव्य. कोणत्या ना कोणत्या रूपात प्रत्येक भारतीय बालकाला रामायणाची कथा माहित असते. 'कोणत्या ना कोणत्या रूपात' असा शब्दप्रयोग मी वापरला कारण शतकानुशतकं रामायणातील प्रमुख कथेनं, तिच्यावर आधारलेली महाकाव्यं, काव्यं, नाटकं आणि कथा लिहीण्याची प्रेरणा असंख्य लेखकांना दिली आहे. उत्तरेकडे तुलसीदास आणि दक्षिणेकडे कंबन या कवींनी स्वतःच्या प्रज्ञेनं रचलेली रामायणं त्या दोन्ही प्रदेशात आजही विलक्षण लोकप्रिय ठरलेली आहेत.


मूळ रामायणावर आधारलेल्या कोणत्याही कलाकृतीतील मुख्य कथा मुळावरहुकूम, जशीच्या तशीच आढळते. अयोध्येचा राजपुत्र राम, याला आपल्या पित्याकडून, दशरथाकडून लवकरच युवराजपदाभिषेक होणार होता. युवराजपदाभिषेकाच्या आदल्या दिवशीच्या संध्याकाळी, दशरथाच्या तीन राण्यांपैकी एकीने, कैकेयीने दशरथाला आठवण केली–"महाराज, एके काळी तुम्ही मला दोन वर दिले आहेत." राजाने कैकेयीला आश्वासन दिले की त्याने तिला दिलेल्या वचनाची पूर्ती करण्यास तो केव्हाही तयार आहे.

कैकेयीने त्वरित मागणी केली की दशरथामागून तिचा पुत्र भरत याला राजपद मिळावं आणि रामाला चौदा वर्षं वनवासाला धाडावं. तिच्या मागणीने राजा अवाक् झाला. या खेरीज तिनं दुसरं काही मागावं अशी त्यानं खूप विनवणी केली. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही.



आपल्या पित्यानं दिलेला शब्द त्याला पाळता यावा, त्याचबरोबर त्याला वचनपूर्तीही करता यावी म्हणून रामानं स्वेच्छेनं अयोध्येचा त्याग केला. त्याच्याबरोबर त्याची पत्नी सीता आणि धाकटा भाऊ लक्ष्मण हेही गेले.

त्यानंतर लगेचच दुःखातिशयाने दशरथ मृत्यू पावला. रामाच्या जागी राहून भरतानं अनिच्छेनं, दुःखानं



अयोध्येचं राज्य केलं.

सीता आणि लक्ष्मण यांच्यासह राम दंडकारण्यातून प्रवास करू लागला. तिथं आश्रमातून राहणाऱ्या अनेक पवित्र ऋषीमुनींशी जाणूनबुजून वैर करणाऱ्या कित्येक राक्षसांना रामानं ठार केलं. राक्षसांचा राजा, लंकाधिपति रावण याने रामाच्या या कृत्याचा सूड घ्यायचं ठरवलं. त्यानं सीतेला पळवलं आणि तिला लंका बेटावर ठेवलं.

रामाने सीतेचा खूप शोध केला. वानरसेनेच्या मदतीनं त्यानं रावणाची तटबंदी मोडली. त्याला ठार केलं आणि सीतेची सुटका केली.

चौदा वर्षं संपली. राम आणि सीता अयोध्येला परतले. राम अयोध्येचा राजा झाला. 'एक आदर्श राजा' अशी त्याची ख्याती झाली. एके दिवशी त्याच्या कानी त्याच्या प्रजाजनांपैकी एकाची तक्रार आली— "रावणासारख्या राक्षसाच्या घरी राहून आलेल्या सीतेचा आम्ही राणी म्हणून स्वीकार करायचा का ?"



रामाच्या आज्ञेवरून लक्ष्मणाने सीतेला वनात नेलं आणि त्याने तिला वाल्मिकींच्या आश्रमापाशी सोडलं.

वाल्मिकींनी सीतेचं स्वागत केलं. तिला आश्रमात ठेवून घेतलं. लवकरच सीतेनं लव आणि कुश या दोन जुळ्या मुलांना जन्म दिला.

वाल्मिकींच्या प्रेमळ सान्निध्यात वाढलेली ती दोन मुलं अतिशय बुद्धीमान् हुशार निपजली. वाल्मिकी त्यावेळी रामायण लिहीत होते. ते महाकाव्य गाऊन दाखवण्यासाठी वाल्मिकी लवकुशांना घेऊन, एके दिवशी रामाच्या राजवाड्यात गेले. जेव्हा रामाला कळलं की ते तेजस्वी पुत्र त्याचेच आहेत तेव्हा त्याला अतिशय आनंद झाला. सीतेला परत आणण्याची त्याने व्यवस्था केली.

जेव्हा सीता अयोध्येला परतली तेव्हा आपलं निर्दोषित्व सिद्ध करण्यासाठी तिला अग्निदिव्य करण्याचं सांगण्यात आलं. परंतु आता सीतेला जगण्याची अजिबात इच्छा नव्हती. तिने भूमिमातेला विनंति केली–



'मी जर पवित्र असेन तर तू मला आपल्या पोटात घे'

धरणी दुभंगली. सीतेला तिनं पोटात घेतलं. सीतेनं सिद्ध केलं की ती पवित्र आहे. इतकी पवित्र की तिच्याबद्दल संशय घेणाऱ्यांमध्ये ती क्षणभरही राहिली नाही.

रामायणाला अतिशय खोल अर्थ आहे. सौंदर्य आणि शालीनता यांची केवळ मूर्ती असलेली सीता जीवनातील सर्व दु:खांना जराही न कुरकुरता सामोरी गेली. म्हणूनच शतकानुशतकं देवी म्हणून लोक सीतेला ओळखतात. सीता म्हणजे सत्य, रावण म्हणजे असत्य, राम म्हणजे सत्यासाठी झगडणारा असा खोल अर्थ लक्षात घेतला तर रामायण म्हणजे सत्यासाठी झगडणाऱ्याने असत्याच्या तावडीतून सत्याची सुटका केली; मात्र संकुचित वृत्तीमुळे अखेर मानव त्या सत्याला पारखा झाला.

जगाच्या वाङ्मयातील एकूण महाकाव्यांमध्ये रामाचे एक विशिष्ट स्थान आहे. आज्ञाधारकपणा आणि कर्तव्य दक्षता यांचा तो पुतळा आहे. जराही कुरकुर न करता त्याने वडलांची आज्ञा प्रमाण मानली आणि राज्यावरील आपला हक्क सोडला. रावणानं पळवून नेलेल्या सीतेच्या शोधार्थ त्यानं हरप्रयत्न केले आणि कर्तव्यतत्पर पतीचा आदर्श त्यानं आचरून दाखवला. शेवटी प्रजा-जनांच्या भावनांचा आदर करण्यासाठी त्यानं अग्निसमान पवित्र असलेल्या आपल्या पत्नीचा, सीतेचाही त्याग केला.

भारतीयांना रामाचं महत्त्व याहीपेक्षा अधिक वाटतं. तो विष्णूचा एक अवतार आहे असं ते मानतात. भरताला 'मदतीसाठी ये' असा संदेश धाडण्या-पेक्षा रामानं वानरसेनेचं नेतृत्व पत्करलं ही गोष्ट महत्त्वाची आहे. रामाला त्याच्या ठिकाणी परात्पर भक्ति आणि आज्ञाधारकता दाखवणारं सैन्य हवं होतं. वानरसेनेमध्ये हे गुण प्रकर्षानं होते. म्हणूनच कोणतंही लष्करी कौशल्य अंगी नसलेलं वानरसैन्य उच्च लष्करी प्रशिक्षण घेतलेल्या राक्षस सैन्याचा पराभव करू शकलं. राक्षससेनेचा नेता दशमुख रावण होता. रावणाला ज्ञानाच्या

दहा निरनिराळ्या शाखा वा विद्या अवगत होत्या म्हणून त्याला दहा तोंडांचा रावण म्हणत असावेत. रावणावर रामानं मिळवलेल्या विजयावरून हेच सिद्ध होतं की सत्य हे कोणत्याही शक्तीपेक्षा श्रेष्ठ आहे.

आजही ठिकठिकाणी शेकडो लोककलापथकं रामायणातील प्रसंग सादर करतात. त्यायोगे ग्रामीण जनतेची करमणूक करतात. चांदण्या रात्री रामाची दु:खं किंवा हनुमानाचा पराक्रम यांची गाणी गात हिंडणाऱ्या गायकाभोवती त्याची गाणी ऐकण्यासाठी गावकऱ्यांनी गर्दी केली नाही असं क्वचित् घडतं.

राम आदर्श राजा होता. त्याच्या कारकीर्दीत त्याची प्रजा सुखी आणि संपन्न होती. म्हणून आजही सुवर्णयुगाचं वर्णन करायचं असेल तर लोक 'रामराज्य' ही संज्ञा त्यासाठी वापरतात. आजही ग्रामपंचायतींमध्ये तंटयाच्या निवाडयाच्या वेळी, 'रामाचं नाव घेऊन शपथ घेतो की खरं सांगेन' असं लोक म्हणतात. कारण राम म्हणजे साक्षात् मानवदेहधारी सत्य होय.

काही प्रमुख भारतीय सण रामजीवनाशी निगडीत आहेत. युद्धानंतर रामाने अयोध्येत केलेला विजयी प्रवेश आजही दिवाळी किंवा दीपोत्सव करून साजरा करतात. देवी दुर्गेची मनापासून आराधना करून रामाने रावणावरील विजयाचा वर तिच्याकडून मिळवला तो दिवस दसरा म्हणून ओळखतात.

असंख्य भारतीय भाषांतरांव्यतिरिक्त रामायणाची परदेशी भाषांतही अनेक भाषांतरं झाली आहेत. पंधराशे वर्षांपूर्वी रामायणाचं चिनी भाषांतर झालं. त्यापाठोपाठ तिबेटी भाषेतही रामायण उपलब्ध झालं. कंबोडियातील एका देवळाच्या शिलालेखात, तिथं रामायण 1400 वर्षांपूर्वी गायिलं गेलं असा उल्लेख आहे.

थायलंडमध्ये रामायणाचा इतका प्रभाव पडला की तेथील राजधानीचं नाव रामाच्या अयोध्या नगरीवरून 'अयुथीया' असं ठेवलं गेलं. राम कथेची इंडोनेशियातील लोकप्रियताही उल्लेखनीय आहे. आजही इंडोनेशियाच्या बेटावरील प्रसिद्ध 'छाया-नृत्य'कार रामायणातील कोणती ना कोणती कथा

सादर करताना आढळतात. खूप खूप वर्षांपूर्वी भारतीय व्यापारी आणि भारतीय संस्कृति प्रचारक यांनी दक्षिण आशियातील देशांमध्ये रामायणाचा प्रसार केला. त्या त्या देशातील लेखक, कवींनी आपापल्या कल्पना आणि स्थानिक कथा रामायणाच्या मूळ कथेत मिसळल्या. आणि त्या त्या देशांत या महाकाव्याची तऱ्हेतऱ्हेची नूतन कल्पनारम्य भाषांतरं निर्माण झाली.

जगाच्या वाङ्मयेतिहासात रामायणाचं स्थान अजोड आहे. या कलाकृती सारखी भाषांतरं कुठल्याच अन्य कलाकृतीची झाली नाहीत. स्वत:च्या देशापलीकडेही ज्याला इतकी लोकप्रियता लाभली आहे असं रामायणासारखं अन्य कथानक नाही.

# महाभारत

एका खेड्यात, एका मुलानं, मोठ्या आकडेबाज मिशांचा, सशक्त आणि बलदंड मनुष्य पाहिला. आश्चर्यचकित झालेला तो मुलगा पळत पळत आपल्या आईकडे गेला आणि उत्साहानं आईला म्हणाला, "आई, आई, मी आत्ता भीमाला पाहिलं !"

तुम्हांला माहित आहेच की भीम हा महाभारतातील श्रेष्ठ वीरांपैकी एक वीर आहे. रामायण आणि महाभारत लिहीली गेल्याला अनेक शतकं होऊन गेली. परंतु त्यातील व्यक्तीरेखा आजही अस्तित्वात आहेत असंच भारतीय मुलांना वाटतं. शंख किंवा चक्र धारण करणारा श्रीकृष्ण, मोठं चकाकणारं धनुष्य बाळगणारा अर्जुन, महाभयंकर भीम, समर्थ पण दयाळू राम, विनासायास एखादा पर्वत हातात उचलून घेऊन त्यासह हवेतून शेकडो मैल दूर जाणारा हनुमान इत्यादी सर्व जण, रोजच्या रोज अवतीभवती वावरणाऱ्या निकटवर्तीयांपैकीच असल्यासारखे त्यांना वाटतात.

महाभारताची थोडक्यात कथा खालीलप्रमाणे आहे:

विचित्रवीर्य या हस्तिनापुरच्या राजाला धृतराष्ट्र आणि पंडु हे दोन मुलगे होते. त्यांपैकी मोठा मुलगा धृतराष्ट्र आंधळा होता. त्यामुळे विचित्रवीर्यनंतर पंडूला हस्तिनापुरचं राज्य मिळालं.


परंतु त्याला एक शाप मिळाला होता. म्हणून आपल्या दोन्ही राण्यांसह त्याला कित्येक वर्षं वनात राहावं लागलं. वनात राहात असताना त्याला पाच

पुत्र झाले. युधिष्ठिर, भीम, अर्जुन, नकुल आणि सहदेव. या मुलांना वनात राहाणाऱ्या ज्ञानी तपस्व्यांनी शिकवलं.

जेव्हा पंडु मरण पावला, तेव्हा त्याची राणी कुंती आणि पुत्र, पांडव हस्तिनापुरास परतले.

दुर्दैवाने धृतराष्ट्राच्या शंभर मुलांना, कौरवांना पांडवाबद्दल असूया वाटू लागली. पांडवांना नष्ट करण्याचे अनेक दुष्ट डाव त्यांनी रचले. युधिष्ठिराच्या क्षमाशील, शांत वृत्तीमुळे पांडवांनी कौरवांच्या दुष्ट कृत्याबद्दल त्यांचा सूड घेतला नाही.

मुलं मोठी झाल्यावर, पूज्य भीष्मांनी, सर्वांनाच



समाधानकारक ठरेल अशी तोड काढून राज्याची वाटणी केली. कौरवांपैकी सर्वांत मोठा कौरव दुर्योधन, हस्तिनापुरच्या जुन्या नगरी राहून कौरवांच्या वाटणीला आलेल्या अर्ध्या राज्याचा कारभार करू लागला. पांडवांपैकी सर्वांत मोठा पांडव युधिष्ठिर, इंद्रप्रस्थ या नव्या राजधानीत राहून उरलेल्या अर्ध्या राज्याचा कारभार करू लागला.

काही वर्षं शांततेत गेली. एके दिवशी कौरवांनी पांडवांना द्यूत खेळण्याचं आव्हान केलं. पांडव हरले. अगोदर ठरल्याप्रमाणं पांडवांना राज्य-त्याग करावा लागला आणि तेरा वर्षं वनवासात राहावं लागलं.

वनवासाहून जेव्हा पांडव परत आले तेव्हा दुर्योधनानं त्यांच्या वाटणीचं अर्धं राज्य त्यांना परत करायचं नाकारलं. शांततेच्या मार्गांनी हा प्रश्न सोडवण्याचे सर्व प्रयत्न विफल झाले. त्यानंतर कुरुक्षेत्री महाभयंकर,



सर्वसंहारक असं युद्ध झालं. युद्धाच्या ऐन क्षणी, आपल्याच नातलगांचा आपण संहार करणार या कल्पनेनं गलितगात्र हतोत्साह झालेला अर्जुन युद्धभूमीवरून काढता पाय घेण्याची भाषा करू लागला. त्यावेळी कोणत्याही वैयक्तिक सुखाची अभिलाषा न धरता, केवळ सत्यासाठी लढण्यातच खरे कर्तव्य कसे आहे ते श्रीकृष्णाने अर्जुनाला समजावले.



श्रीकृष्णाने अर्जुनाला समजावून दिलेलं त्याचं कर्तव्य म्हणजेच गीता होय. वर्षानुवर्षं अनेक लोकांना मानसिक, आध्यात्मिक सामर्थ्य देण्याचं महनीय कार्य गीतेनं बजावलं आहे. युद्धप्रसंगी श्रीकृष्ण अर्जुनाचा सारथी आणि मार्गदर्शक होता.

कौरवांचा सर्वनाश झाला. युधिष्ठिराला राज्याभिषेक केला गेला. परंतु



त्यानतर पांडवांना वाटू लागलं की ऐहिक जय आणि संपन्नता या किरकोळ महत्त्वाच्या गोष्टी आहेत. न्यायाने आणि शहाणपणाने छत्तीस वर्षं राज्य केल्या-नंतर पांडवांनी आपला नातू परिक्षित याला राज्य दिलं आणि ते सर्व हिमा-लयाच्या यात्रेला निघून गेले.

त्या अज्ञात अवघड अशा भागातून प्रवास करत असताना युधिष्ठिराची पत्नी आणि सर्व भाऊ विलक्षण श्रमाने थकून एका पाठोपाठ एक असे खाली पडले आणि मृत्यू पावले. एकटा युधिष्ठिर मृत्यू पावला नाही. तो स्वर्गात पोहोचला. अत्त्युच्च आध्यात्मिक ध्येय गाठायचं तर मानवी देह हा एक अडथळा आहे असं जे पुष्कळांना वाटतं ते खरं नाही हेच यावरून सिद्ध होतं.

महाभारतात पुष्कळ कथा आहेत. त्या सर्वच अर्थपूर्ण आहेत. महाभारता-मध्ये जीवनाच्या विविध अंगांचं जसं दर्शन घडतं तसं जगातील इतर कोणत्याच पुस्तकात पहावयास सापडत नाही. असा एक वाक्प्रचार आहे की—"महाभारतात जे नाही ते भारतात नाही." भारतात जे जे आहे त्याची किंवा किमान, भूतपूर्व-कालीन भारताची संक्षिप्त आवृत्ती म्हणजे महाभारत असं महाभारताचं आपण वर्णन करू शकू.

दिव्य द्रष्टया व्यासांनी महाभारत रचलं आहे. श्लोकनिर्मितीच्या आनंद-मग्न अवस्थेत तल्लीन राहाणाऱ्या व्यासांना त्यांच्या तोंडून बाहेर पडणारे या महाकाव्यातील श्लोक लिहून घेण्यासाठी कुणीतरी लेखक हवा होता. त्यांनी बुद्धिदात्या गणेशाला लेखन करण्याची विनंति केली. गणेश तयार झाला. पण त्यानं अट घातली की काव्य स्फुरलं नाही या सबबीवर व्यासांनी त्याच्या लेखनात खंड पाडता कामा नये. व्यासांनी गणेशाची अट मान्य करताना स्वतःची अट घातली की त्यांच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या रचनेचा पूर्ण अर्थ समजल्या खेरीज गणेशानं काहीही उतरवून घेता कामा नये.

अशा तऱ्हेनं 90,000 श्लोक आणि अठरा खंड असलेलं महाभारत लिहीलं गेलं.

# पुराणं

"नंतर पाऊस आला. आत्म्याला माणसाच्या अहंकारानं ग्रासावं त्याप्रमाणे काळ्या मेघांनी चंद्रम्याला झाकळून टाकलं. वरदानाप्रमाणे वृष्टी झाली. सर्वत्र प्रसन्नता, संपन्नता, सुंदरता, भरून राहिली.

त्यानंतर हेमंत ऋतु आला. तपश्चर्येनं मन विकाररहित व्हावं त्याप्रमाणे आकाश आणि पाणी स्वच्छ बनलं. अज्ञ जनाच्या चुकीच्या कल्पना नष्ट व्हाव्या त्याप्रमाणे रस्त्यावरील चिखल हळू हळू अदृश्य व्हायला लागला. आत्मसाक्षात्कार घडल्यानंतर शांत बनलेल्या आत्म्याप्रमाणे समुद्र शांत बनला. खऱ्याखुऱ्या, सत्य ज्ञानासारखा चंद्रमा झळकू लागला."


हा उतारा, एकूण पुराणांमधील सर्वांत लोकप्रिय पुराणामधील, भागवतामधील आहे. येथे कवी मानवी मनाच्या अवस्थांशी निसर्गाच्या अवस्थांचे साधर्म्य दाखवतो. भागवताच्या पानोपानी हीच शैली वापरल्याचे जाणवते.

दिव्य बालक श्रीकृष्णाची अद्भुत मुरली रानावनातून ऐकू येते. गाई, गोप, गोपी-एवढंच काय यमुना नदीही—देहभान हरपून बासरीतून बाहेर येणारं दिव्य संगीत ऐकतांना तल्लीन होतात. ही नुसतीच कविकल्पना आहे असं मानण्याचं कारण नाही. त्यामधे खोल अर्थ दडलेला आहे. बासरी ही परमात्म्याने निसर्गाच्या आणि सर्व प्राणीमात्रांच्या आत्म्याला घातलेली साद आहे; जिचा नाद एकाग्रचित्त असतानाच ऐकू येतो.

भागवतात श्रीकृष्णाच्या जीवनातील अनेक कथा सांगितल्या आहेत. त्या प्रत्येक कथेमध्ये काही गूढ अर्थ दडलेला आहे.

इसवी सनाच्या पहिल्या ते सहाव्या शतकात लिहिल्या गेलेल्या पुराणांपैकी भागवत हे एक पुराण आहे. सर्व पुराणातील मूळ पुराण – जे व्यासांनी रचलं आहे असं मानलं जातं, त्याचा काल मात्र फार पुरातन असणार. व्यासांच्या मूळ वाङ्मयकृतीवरून कल्पना आणि प्रेरणा घेऊन त्यांच्या शिष्यांनी आणि शिष्यांच्या शिष्यांनी वेळोवेळी मिळून एकूण छत्तीस पुराणं लिहीली. त्यापैकीं जी महत्त्वाची आहेत ती महापुराणं म्हणून ओळखली जातात. इतर पुराणांना 'उपपुराणं' असं संबोधतात. विष्णु, भागवत, नारदीय, गरूड, पद्म, वराह, अग्नि, मार्कंडेय, भविष्य, वामन, वायु, लिंग, स्कंद, मत्स्य आणि कूर्म ही सर्व महापुराणं होत.


'पुराण' या संस्कृत संज्ञेचा अर्थ 'नित्य नूतन असणाऱ्या जुन्या कथा' ('पुराण अपि नवं' म्हणजेच 'जरी प्राचीन तरी नूतन') असा आहे.



पुराणांमधून जरी प्राय: ब्रह्मा, विष्णु, महेश या प्रमुख देवांच्या लीलांची, गुणांची वर्णनं असली तरी त्यामध्ये इतरही अनेक गोष्टींचा अंतर्भाव आहे. पाश्चात्त्य जगताला पृथ्वी सूर्यमालेच्या केन्द्रस्थानी आहे का नाही हा प्रश्न पडण्याचा अगोदर कित्येक वर्षे विष्णु पुराणात स्पष्टपणे म्हटले आहे की सूर्यमालेत पृथ्वी ही केंद्रस्थानी नसून सूर्य हाच केंद्रस्थानी आहे, हे आश्चर्यकारक नाही का ?

या चराचर विश्वाची उत्पत्ति कशी झाली, ते विश्व कसं स्थिर झालं आणि कालौघात चक्रमेनिक्रमाप्रमाणे ते संपूर्ण नष्ट होत असतानाच त्यातून नव्या सृष्टीची उत्पत्ती कशी होत जाणार याची सुस्पष्ट, समग्र चर्चा पुराणांमधून केलेली आहे.

अर्थात पुराणांमधून सदासर्वदा, सर्वकाळ, केवळ कठीण तत्त्वज्ञानाची किंवा अवघड शास्त्रीय विषयाचीच चर्चा केली आहे असं नव्हे. उदाहरणार्थ, गरूड पुराणामध्ये कित्येक औषधांची, आपलं शरीर निरोगी, सुदृढ कसं राखावं याची माहिती दिलेली आहे.




महापुराणं आणि उपपुराणं सोडून पुराणांचाच, स्थलपुराण— असा तिसरा एक प्रकार आहे. त्यामध्ये भारतातील अनेक वैभवसंपन्न, पवित्र ठिकाणांची, स्थळांची माहिती दिलेली आहे. शतकानुशतकं ही छोटी पुराणं

भारतीय परंपरा आणि प्राचीन इतिहास यांचं भांडारच होऊन राहिली. त्यावरून स्फूर्ति घेऊन हिमालय ते कन्याकुमारी इतक्या विशाल प्रदेशातील अनेक पवित्र ठिकाणांच्या यात्रा करण्याची प्रथा लोकांमधे पडली.

खरं पाहता, पुराणं लिहीणाऱ्या सर्वच ग्रंथकारांनी संपूर्ण भारतभूला आईच्या शरीराइतकं पवित्र मानलं आहे. या विधानाला पुष्टि देईल अशी एक सार्थ कथा कलिकापुराणात दिलेली आहे :

हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या प्राचीन नगरीत दक्ष नावाचा एक तरुण राजा राहात होता. तो महामाया किंवा आदिमाता पार्वतीचा भक्त होता. त्याच्या भक्तीने प्रसन्न होऊन देवीने त्याला वर देऊ केला. राजानं असा वर मागितला की आदिमायेनं त्याच्या पोटी कन्या म्हणून जन्म घ्यावा.

आदिमाया तथास्तु म्हणाली. परंतु तिनं



राजाला बजावलं— "मी मानवी देह धारण केल्यानंतर जर तू माझं दैवी स्वरूप लक्षात न घेता मला अपमानास्पद वागणूक दिलीस तर मी ताबडतोब देहत्याग करीन."

"तुझ्या दैवी स्वरूपाचा मला कसा विसर पडेल?" दक्षानं प्रतिप्रश्न केला.

त्यानंतर काही दिवसांनी दक्ष राज्य करत असतांना आदिमायेनं मानवी देह धारण केला आणि दक्षाची मुलगी म्हणून ती जन्माला आली. ती दक्षकन्या अनुपम लावण्यवती होती. दक्षानं तिचं नाव सती असं ठेवलं.

दक्षाचं आपल्या मुलीवर अतिशय प्रेम होतं. परंतु जसजशी ती मोठी होऊ लागली, ती त्याची केवळ मुलगीच नसून त्या पलीकडेही तिचं काही स्थान आहे हे तो विसरला. देवदेवतांच्या मध्यस्थीने, जेव्हा भोळ्या सांब सदाशिवाशी म्हणजेच शंकराशी, सतीचा विवाह झाला, तेव्हा दक्षाला काही विशेष आनंद झाला नाही.

एक बैल (नंदी), काही नाग आणि वरीचशी भुतंखेतं यांच्यासारख्या अजब प्राण्यांच्या सहवासात शिव पर्वतशिखरावर राहात होता. कुणाचाही पाहुणचार करता येईल असं चांगलंसं घर त्याला नव्हतं. आपली कन्या आणि जावई ही काही साधी सुधी मर्त्य माणसं नव्हेत हे जर लक्षात घेतलं नाही तर, ज्या घरी जायला नातेवाईक कुरकुरतील, अशा घरी आपली मुलगी राहावी असं कोणत्या पित्याला वाटेल ?

दक्षाच्या राजवाड्यात एके दिवशी खूप मोठा उत्सव होता. सती आणि शिव सोडून इतर सर्व आप्तजनांना दक्षानं आमंत्रण धाडलं. सतीला महर्षि नारदांकडून दक्षाकडील उत्सवाचं वर्तमान समजलं. वडलांकडे, माहेरी, ताबडतोब जाण्याचा तिनं बेत केला. 'बोलावणं नसताना तिनं का जावं—' असा शिवानं प्रश्न केला. पण वडलांनी केवळ औपचारिक निमंत्रण दिलं नाही म्हणून मुलीनं माहेरी जाण्याची अळंटळं करावी का— असं सतीनं उत्तर दिलं.

संध्या समय झाला होता. सभोवती तेवत असलेल्या हजारो दीपज्योतींच्या

प्रकाशात दक्षाचा राजवाडा उजळून निघाला होता. राजवाड्यामधील मध्यवर्ति सभागृहात शेकडो निमंत्रित जमले होते. अशावेळी प्रफुल्लित, हसऱ्या चेहऱ्याने सती आपल्या वडलांसमोर उभी राहिली. तिचं दुर्दैव असं की तिला पाहून दक्षाला काही आनंद झाला नाही. सतीचा साधासुधा वेष पाहून त्याला शरमल्यासारखं झालं. सतीच्या या असल्या दुर्दशेला जबाबदार कोण ? आपल्या साध्याभोळ्या, निष्काळजी, जावयामुळेच सती असल्या हीनदीन अवस्थेला पोचली आहे असा विचार दक्षाच्या मनात आला.

रागाच्या भरात त्याने शिवाची निंदा आरंभली. एक वेळ तिचा स्वतःचा दक्षानं अपमान केला असता तर सतीला चाललं असतं. पण वडलांनी चालवलेली पतीची निंदा तिला सहन होण्यासारखी नव्हती. अतीव दुःखानं सती खाली कोसळली आणि मृत झाली.

या दुर्घटनेची खबर शिवाला मिळाली. एरवी शांत, तपस्यामग्न असलेला शिव क्रोधानं थरथरू लागला. त्याच्या रागातून असंख्य अति मानवी प्राणी जन्माला आले. नासधूस करण्यासाठी, संहार करण्यासाठी उद्युक्त होऊन ते दणादणा, दक्षाच्या राजवाड्यावर चालून गेले. डोळ्याचं पातं लवलं असेल नसेल तोच त्यांनी त्या समारंभस्थळाला स्मशानकळा आणली.

लवकरच शिवही तेथे पोचला आणि आपल्या प्रिय पत्नीच्या मृतदेहाशेजारी निःशब्दपणे बसून राहिला. नंतर सतीचा मृतदेह खांद्यावर टाकून तो उठला. सतीच्या वियोगाचं दुःखं सहन न होऊन, तो एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकू लागला.

सरतेशेवटी विष्णूंनी शिवाच्या नकळत आपल्या सुदर्शन चक्राच्या सहाय्याने सतीच्या मृतदेहाचे तुकडे तुकडे करायला सुरुवात केली. जेव्हा खांद्यावर सतीचा देह दिसेना तेव्हा शिवपुन्हा पर्वतावर गेला आणि तपःश्चर्येत मग्न झाला.

# तिरुक्कुरल

भारताला ज्याचा सार्थ अभिमान आहे अशा उज्वल प्राचीन वारशामध्ये तामीळ भाषेने अद्वितीय भर घातली आहे. आज जगात प्रचलित असलेल्या ज्या प्राचीन भाषा आहेत, त्यापैकी तामीळ भाषा एक आहे. एकाच वेळी नांदणाऱ्या सख्या बहिणींप्रमाणे संस्कृत आणि तामीळ या दोन्ही भाषा भारतात शतकानुशतके प्रचारात होत्या.

दोन हजार वर्षांपूर्वी तामीळनाडुमधील एका संतमहात्म्याने छोटी छोटी कडवी असलेली एक मोठी पद्यमय रचना केली. त्यातील ओजस्विता आणि आशय या दोन्ही दृष्टीने त्यांना भारतीय वाङमयात तोड नाही. ती पद्यमय रचना 'तिरक्कुरल' किंवा 'कुरल' या नावाने सुपरिचित आहे. 'तिरु' म्हणजे पवित्र आणि 'कुरल' म्हणजे छोटी कविता होय. तिरुक्कुरलमध्ये 133 अध्याय आहेत. प्रत्येक अध्यायात दहा दहा कडवी आहेत.

ज्या संतमहात्म्याने तिरुक्कुरलची रचना केली तो तिरुवल्लुवर या नावाने ओळखला जातो. प्राचीन काळातील अनेक थोर लोकांप्रमाणेच तिरुवल्लुवरच्या जीवनाविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. त्याचं खरं नावही माहित नाही. 'तिरुवल्लुवर' याचा शब्दशः अर्थ 'वल्लुव जातीतील भक्त' असा होतो. वल्लुव लोक राजसेवक होते. हत्तीवर बसून राजाच्या नावाने दवंडी पिटण्याचे किंवा लिलाव पुकारण्याचे काम वल्लुव करीत. तिरुवल्लुवरने मात्र हा पेशा पत्करलेला दिसत नाही. तो विणकाम करीत मैलापोर येथे राहू लागला. हल्लीच्या मद्रास शहराचा हा एक भाग आहे. तिरुवल्लुवर खरोखरीच वस्त्रे विणत होता अथवा नाही याबद्दल आपल्याला काहीच खात्रीपूर्वक सांगता येत नाही. त्याच्या सुंदर रचना कौशल्यावर खूष होऊन कुणी लाक्षणिक अर्थाने त्याला पद्यमय वस्त्रा-

लंकार तयार करणारा' म्हटलं असण्याचीही शक्यता आहे.

त्याच्याबद्दलच्या अनेक मनोरंजक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. कोणाला काहीही अडचणी निर्माण झाल्या की तिरुवल्लुवरचा सल्ला घ्यायला लोक येत. नुसता रुक्ष शाब्दिक सल्ला द्यायच्या ऐवजी, जिथं जिथं शक्य असेल तिथं तिथं उपमा, दृष्टान्त कथा सांगून तिरुवल्लुवर आलेल्यांना सल्ला देत असे.

एके सकाळी एक तरुण आपली काही समस्या सांगण्यासाठी त्याच्याकडे आला. "महाराज, कृपा करून मला सांगा की कुणालाही वायको असणं चांगलं का वायको नसणं चांगलं ?



तिरुवल्लुवर हसला. त्यानं त्या तरुणाला आणखी काही तास त्याच्याबरोबर थांबण्यास सांगितलं. ते दोघे सकाळच्या न्याहारीसाठी बसले. तेव्हां तिरुवल्लुवरच्या बायकोने आदल्या रात्री केलेला थंडगार भात पानात वाढला. परंतु तिरुवल्लुवर तिच्यावर ओरडला, "वासुकी हा भात भलताच गरम आहे."

त्यावर एक अक्षरही न बोलता, वासुकी पानातला भात निवण्यासाठी त्याला वारा घालू लागली.

माध्यान्हसमयी तिरुवल्लुवर आणि त्याचा तरुण पाहुणा यांचं जेवण ऐन रंगात आलं असता तिरुवल्लुवर पुन्हा वासुकीवर खेकसला, "वासुकी, अग ऽ एवढी रात्र झाली तरी तू इथं दिवा ठेवला नाहीस म्हणजे कसं काय ?"

जराही न कुरकुरता, वासुकीने दिवा लावला.

तो तरुण म्हणाला, "महाराज, तुमच्याकडून मला, माझ्या प्रश्नाचं उत्तर मिळालं. तुमच्या पत्नीप्रमाणे जर कोणतीही स्त्री पतिपरायण आणि आज्ञाधारक असेल तर बायको नसण्यापेक्षा बायको असलेली केव्हाही चांगली."

तिरुवल्लुवरने राजदरबारी नोकरी केली नाही. परंतु त्याच्या नंतरच्या पिढ्यांनी त्याला ज्ञानियांचा राजा ठरवले. माणसाला ज्या कठीण परिस्थितीला कदाचित् तोंड द्यावं लागेल त्यावर, जीवनाच्या विविध अवस्थांवर, कुरलमध्ये फारच उत्तम, व्यावहारिक सल्ला दिलेला आहे.

जीवनातील केवळ नैतिक बाजूंवरच तिरुक्कुरलने भर दिला नाही. मुत्सद्दीपणा, चतुराई, राजनीति आणि मानवी कार्यक्षेत्रातील इतरही अनेक अंगांवाबत तिरुक्कुरलमध्ये योग्य ते मार्गदर्शन, केलेले आढळते.

# कथासरित्सागर

एका गोष्टीत दुसरी गोष्ट — त्या गोष्टीत आणखी एक गोष्ट — राजे आणि पिशाच्चे, हुशार तरुण आणि सुंदर तरुणी, दुष्टांच्या हिकमती आणि मूर्खांचे साधेपण, बोलणारे पशु आणि जादूचे पर्वत, गूढ किल्ले आणि अजब साहसे ह्यांच्या शेकडो कथा म्हणजे कथासरित्सागर – जगातील सर्वात जुना, प्राचीन असा, गोष्टींचा संग्रह होय.

त्या कथा केव्हा आणि कुणी लिहील्या ? त्यांच्यापैकी काहीतर फार फार जुन्या असाव्यात, हजारो वर्षांपूर्वी, आज आहे त्यापेक्षा किंचित् वेगळ्या प्रकारे त्या सांगितल्या गेल्या असाव्यात. त्यापैकी काही काश्मीर खोऱ्यात, झेलम नदीच्या काठी जमलेल्या गावकऱ्यांना वादळी संध्याकाळी सांगितल्या गेलेल्या असाव्यात. दुसऱ्या काही दक्षिणेकडील कन्याकुमारीच्या वाजूच्या असाव्यात. उकाड्याच्या दिवशी आपल्या बोटीच्या छायेत विश्रांति घेणाऱ्या एखाद्या कोळयाने, सभोवती जमलेल्या मुलांना त्या सांगितल्या असाव्यात.

भारताच्या कानाकोपऱ्यातून गोष्टींचा ओघ कथासरित्सागरकडे येत राहिला. कारण 'कथासरित्सागर'चा शब्दशः अर्थ 'गोष्टींच्या नद्या मिळून बनलेला समुद्र' असा होय. निरनिराळ्या दिशांनी नद्या समुद्राकडे वाहात येतात. ज्याने या सर्व कथा संकलित केल्या त्याला त्या गोष्टी, ठिकठिकाणाहून

आलेल्या आहेत याची निश्चितपणे खात्री होती.

'कथासरित्सागर' मधील कथा सोमदेवाने संकलित केल्या आहेत. सुमारे एक हजार वर्षांपूर्वी काश्मीरमध्ये सोमदेव होऊन गेला. ज्या पुस्तकावरून त्याने कथासरित्सागरमधील बहुतेक कथा घेतल्या त्याचा काहीच शोध लागत नाही. आपल्याला फक्त एवढंच माहीत आहे की त्या पुस्तकाचं नाव 'बृहत् कथा' किंवा 'दीर्घ कथा' असं होतं.

'बृहत् कथा' गुणाढयाने लिहिली. ती पैशाची भाषेत आहे. पैशाची भाषा मध्यंतरी लोप पावली होती. गुणाढ्याने त्या कथा पद्यात रचल्या. आणि उत्सुकतेने त्याने आपला राजा सातवाहन यास त्या दाखवल्या. असं म्हटलं जातं की सातवाहनाने त्या कथांबद्दल विशेष औत्सुक्य न दाखवल्यानं, चिडलेल्या, निराश झालेल्या गुणाढ्याने आपल्या हस्तलिखिताचे पानामागून पान अग्नीत टाकण्यास सुरुवात केली. सातवाहनाला आपल्या वागण्याचा पश्चात्ताप झाला आणि त्याने गुणाढ्याला 'बृहत कथा' भस्मसात करण्यापासून थांबवले. परंतु त्यावेळेपर्यंत तीन चतुर्थांश हस्तलिखित आगीच्या भक्ष्यस्थानी पडले होते.

सोमदेवाने 'बृहत् कथा' संस्कृतमध्ये करण्या अगोदरच बृहत् कथांनी भारताचा किनारा सोडून दूरदूरच्या देशांपर्यंत प्रवास केला होता. 'अरेबिअन नाईट्स'च्या रूपांत त्यांच्यापैकी काही कथांची ओळख पटते.

'कथा सरित्सागर' मधील गोष्टी ह्या कुणा एका व्यक्तीच्या प्रतिभेचा विलास नाही एवढं निश्चितपणे खरं आहे. त्यांचे अज्ञात लेखक भारताच्या प्रांताप्रांतातील आहेत. ते कुणी पंडित, ज्ञानी नसावेत. परंतु मानवी मनाची अचूक जाण त्यांना होती हे खरंच आहे. ढोंग्यांचा कावेबाजपणा ते कठोरपणे उघडकीला आणतात. साध्या सरळमार्गी माणसांना भोगावी लागणारी दुःखे ते हळुवारपणे वर्णितात. आणि जगाच्या रीतीबद्दल भाष्य करतांना ते अतिशय वास्तववादी बनतात.

दुष्टपणाला शासन घडते आणि सद्गुणांचे चीज होते या तऱ्हेच्या कथा

उत्तम वठल्या आहेत हे मुद्दाम स्पष्ट केले पाहिजे. इथे दिलेली कथा याच प्रकारात मोडते:

एके काळी, एका देवळात एक ढोंगी वैद्यबुवा राहात होते. आपण मौन पाळण्याचं व्रत घेतलं आहे असं ते भासवत. लोकांना त्यांच्याविषयी फार आदर वाटे. त्यांच्या भेटीला येताना रीतीप्रमाणे ते उत्तमोत्तम वस्तू, खाद्यपदार्थ, कपडे आणि पैसे आणत आणि भक्तीभावाने वैद्यबुवांना अर्पण करत. आलेल्या भेटींपैकी किंमती वस्तु, चांगले चुंगले पदार्थ वैद्यबुवा स्वत:साठी ठेवत. राहिलेला गाळसाळ, त्यांच्याभोवती असणाऱ्या, स्वत:ला त्यांचे शिष्य म्हणवणाऱ्यांमध्ये वाटून टाकत.

एके दिवशी एक श्रीमंत व्यापारी, आपली बायको आणि मुलगी यांच्यासह वैद्यबुवांच्या भेटीला आला. व्यापाऱ्याची मुलगी सुरेख होती. ती आपली बायको व्हावी असा वैद्यबुवांना लोभ सुटला. त्या मुलीबद्दल तिच्या वडलांजवळ तो उघड उघड मागणी घालू शकत होता. कारण त्या काळी सधन माणसांनी आपल्या मुली वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांना देण्याची रीत होती. परंतु प्रस्तुतचे वैद्यबुवा लबाड ढोंगी होते. त्यांनी एक दुष्ट डाव रचला. व्यापाऱ्याला त्यांनी एका बाजूला नेले. आणि सांगितले, "तुला माहितच आहे की मी मौनव्रत घेतलं आहे. परंतु मला तुझ्याबद्दल आत्मीयता वाटते म्हणूनच केवळ मी बोलणार आहे. विषय तुझ्या मुलीबद्दलचा आहे. तिचं नशीव खडतर आहे. आणि तू जर तिला तुझ्याजवळ ठेवलीस तर तुझं नशिवही उलटणार आहे."

"मी काय करावं ?" त्या व्यापाऱ्याने काळजीच्या सुरात विचारलं. "अगदी सोपा उपाय सांगतो" वैद्यबुवा म्हणाले. "तिला एका पेटीत बसव अन् आज रात्री ती पेटी नदीत सोडून दे. पेटीवर एक दिवा ठेव."

"ठीक आहे" व्यापारी म्हणाला.

त्या रात्री, शिकारीहून परत येणारा एक राजपुत्र नेमका ती नदी ओलांडून जात होता. नदीतून वहात येणाऱ्या वर दिवा असलेल्या 'त्या' पेटीने त्याचे लक्ष

वेधून घेतले. त्याने ती पेटी नौकेवर ओढून घेतली. उघडली. आतमध्ये एक सुंदर तरुण मुलगी रडत बसलेली पाहून त्याला आश्चर्याचा धक्काच बसला.

त्या राजपुत्राजवळ एक अक्राळविक्राळ माकड होतं. तो शिकारीला गेला असता त्यानं ते पकडलं होतं. त्यानं मुलीऐवजी ते माकड पेटीत ठेवलं. पेटी बंद केली. त्यावर परत होता तसा दिवा ठेवला आणि पेटी परत वाहत्या पाण्यात सोडून दिली.

इकडे देवळा जवळच्या नदीकिनारी, वर दिवा ठेवलेल्या पेटीची, वैद्यबुवा विलक्षण उत्सुकतेने वाट पहात होते. पेटी दृष्टीला पडताच त्यांनी आपल्या शिष्यांना पेटीपर्यंत पोहत जाण्याची आणि ती पेटी त्यांच्याकडे आणण्याची



आज्ञा केली. त्यांच्या शिष्यांनी ती पेटी वैद्यबुवांच्या खोलीत आणली. वैद्यबुवांनी आपल्या शिष्यांना हाकलून दिलं. आणि अधीरतेने पेटी उघडली.

काय होत आहे हे कळायच्या आतच त्यांच्या नाकाचा मोठ्ठा तुकडा पडला. त्यानंतर त्यांच्या कानाचीही तीच अवस्था झाली.

वेड्या माणसाप्रमाणे वैद्यबुवा जोरात किंचाळले आणि पळाले. त्यानंतर ते कधीही दिसले नाहीत. एका सुंदर तरुणीचं, रानटी माकडात कसं रूपांतर झालं याचं वैद्यबुवांना नक्कीच आश्चर्य वाटलं असणार !



लवकरच त्या राजपुत्राचं त्या सुंदर मुलीशी लग्न झालं आणि त्यानंतर ते सदैव सुखात राहू लागले हे सांगायला नकोच.



# पंचतंत्र

प्राचीन काळची गोष्ट. एका राजाला तीन मुलगे होते. त्या राजपुत्रांचं शिकण्याकडे अजिबात लक्ष नव्हतं. सारा वेळ ते आळशीपणात घालवत. त्यांच्या वागण्याचं राजाला फार दु:ख होत असे. त्या राजपुत्रांनी आपलं आयुष्य असंच काही न करण्यात घालवायचं ठरवलं तर आपल्या राज्याला कुणी वारस उरणार नाही हे राजाला माहीत होतं.

राजपुत्रांना शिकवण्याकरता त्यानं एकामागून एक, नवनवे शिक्षक ठेवले. पण व्यर्थ. शिक्षकाला पाहताच राजपुत्र गडवड करून पळून जात.

दिवस सरत होते. राजा अधिकच उदास अन् त्रस्त बनत होता. सरतेशेवटी राजाने देशातील सर्व विद्वानांची एक सभा बोलावली. आणि सभेपुढे आपली समस्या मांडून म्हटले, "आपणापैकी कुणी मला सहाय्य करील का ?"

बराच वेळ कुणीच उत्तर दिलं नाही. सरतेशेवटी एक विद्वान् उठला आणि म्हणाला, "हे राजन्, तुझ्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी तू माझ्यावर सोपवत असशील तर मी प्रयत्नांची पराकाष्ठा करून त्यांना विद्या शिकवीन."


तो विद्वान् म्हणजे विष्णुशर्मा होय. त्याच्या पंडित्यावद्दल साऱ्या राज्यभर त्याची ख्याती होती. अशा व्यक्तीने आपल्या मुलांच्या शिक्षणाबाबत पुढाकार घेण्याची तयारी दाखवली म्हणून राजा फार खूष झाला.

राजाचा राजवाडा फारच विस्तीर्ण अन् भव्य होता. त्याचे लांब आणि रुंद छत ठिकठिकाणी सभोवतालच्या उंच वृक्षराजीमुळे आच्छादले जाई. आपल्या

शिष्यांना घेऊन विष्णु शर्मा छपरावरील एका शांत कोपऱ्यात गेला. शिष्यांना आपल्या पुढे बसवून घेऊन तोही त्यांच्या समवेत खाली बसला.

राजपुत्रांना शिक्षणाचा मनस्वी कंटाळा असल्याने आपल्या नव्या गुरुला पाहून ते विशेषसे आनंदित झाले नाहीत. पण लवकरच ते बसल्या जागचे उठायलाही तयार होईनात. ज्ञानदान करण्याची विष्णु शर्माची पद्धत अद्वितीय होती. त्याने सुरुवात केली, "गोदावरी नदीच्या तीरी एक विशाल वृक्ष होता. रात्री त्या वृक्षाच्या आश्रयाला चहू दिशांनी अनंत पक्षी येत...."

आणि तो गोष्टी सांगतच राहिला. त्याच्या कथा पशूंच्या आणि पक्ष्यांच्याच होत्या. परंतु प्रत्यक्षात त्या मनुष्यमात्राला लागू होणाऱ्या होत्या. मानवाच्या विविध समस्या आणि त्यावरील उपाययोजना यासंबंधीच्या त्या कथा होत्या.



आदर्श मित्र कोण ? मैत्री कशी टिकवावी ? ज्यामुळे आपला सर्वनाश होतो असे मोह कसे टाळावेत. सज्जनपणा, भलेपणा तरीही सावधानता, उमदेपणा तरीही चाणाक्षपणा हाच शेवटी यशस्वी होतो असे या कथांतून प्रतिपादले आहे.

विष्णु शर्म्याने वेळोवेळी दिलेल्या पाठांमुळे राजपुत्र ज्ञानी आणि संवेदनाक्षम बनले.

पंचतंत्रातील कथा वेळोवेळी पुन्हा पुन्हा सांगितल्या गेल्या आहेत. ज्या विशेष लोकप्रिय नाहीत अशा काही कथा अतिशय मौलीक आहेत. उदाहरणार्थ 'बोलकी गुहा' ही कथा. कथा या दृष्टीने ती मनोरंजक तर आहेच. त्याहीपेक्षा प्रत्येकानं आत्मरक्षणाकडे कसं लक्ष ठेवलं पाहिजे याचा धडा ती कथा देते.



एके काळी एका रानात एक कोल्हा राहात होता. स्वतःच्या राहण्यासाठी त्याने एक एकाकी गुहा पसंत केली होती. एके दिवशी तो बाहेर गेला असता, एक भुकेला, थकलेला सिंह गुहेपाशी आला. त्याने गुहेत प्रवेश केला आणि चहूकडे हुंगून पाहिले. या ठिकाणी नक्कीच एकादा कोल्हा रहात असला पाहिजे असा सिंहाने स्वतःशी अंदाज केला. 'मग आता भक्ष्य शोधत मी कशाला हिंडू ? मी आता आडवा होतो आणि आराम करतो. कोल्हा परत आला की मला आयती चमचमीत मेजवानी मिळेल.'

संध्यासमयी कोल्हा घरी परतला. तो गुहेत शिरण्याचा विचार करत असतानाच त्याला जमिनीवर सिंहाच्या पंजाचे अस्पष्ट ठसे आढळले. ते पाहून त्याचं हृदय जोरजोरानं धडधडू लागलं. मग धीर करून तो जोरानं ओरडून बोलू लागला, "हं, कसं काय, बोलक्या गुहे, आज तू गप्प का ? जेव्हा मी दररोज परत येतो तेव्हा तू माझं स्वागत करीत म्हणतेस, 'कोल्हे महाराज, तुमचं स्वागत असो' पण आज पाहतो तर तू आपली गप्पच आहेस. मी आत प्रवेश करू नये असं तुला वाटतं की काय ?"

इकडे सिंहाने विचार केला, 'मी आत आहे म्हणूनच गुहा घाबरली आहे हे निश्चित. म्हणूनच ती कोल्ह्याला उत्तर देत नाही.'

सिंहाने जोरदार गर्जना केली आणि म्हटले, "कोल्हे महाराज तुमचं स्वागत ? मनःपूर्वक स्वागत !"

स्वतःचा जीव वाचवण्यासाठी पळत सुटलेल्या कोल्ह्याने मागे पाहात म्हटले, "प्रियतम गुहे, तुझा त्याग करण्याचं मी ठरवलं आहे."

आणि कोल्हा स्वतःशीच पुटपुटला, "बोलकी गुहा ! हुंः ! असली गोष्ट कधी ऐकलीय ? मी बचावलो म्हणून त्या परमेश्वराचे आभार !"

# जातकं

आज जगातील फार मोठ्या भागात बौद्धधर्म पाळला जातो. भारतात आज फारसे बुद्धधर्मीय लोक नसले तरी प्रत्येक भारतीयाला बुद्धजीवनाविषयी काही ना काही माहिती असतेच. बुद्ध एक राजपुत्र होता. गौतम या नावाने तो ज्ञात होता. आपले कुटुंब, ऐश्वर्य, सत्ता, उच्च स्थान या सर्वांचा त्याग करून तो वनात गेला. दुःखावर विजय मिळवण्याचा मार्ग त्याला शोधायचा होता. परंतु दंतकथा असं सांगते की गौतम म्हणून तो जन्माला येण्यापूर्वी बुद्धाने अनेक जन्म घेतले. कधी मानवरूपात तर कधी पशुरूपात तो वावरला. प्रत्येक जन्मात त्याने अनेक मौलीक अनुभव मिळवले. जेव्हा तो बुद्ध (ज्ञाता) म्हणून ओळखला जाऊ लागला तेव्हा त्याने आपल्या अनेक जन्मांचं सार आपल्या शिष्यांना सांगितलं.

या साररूप कथा जातक कथा या नावाने ओळखल्या जातात. त्यापैकी बुद्धाने खरोखरच सांगितलेल्या किती आणि त्याच्या उत्साही शिष्यांनी मूळ जातक कथात स्वतःच्या मिळवलेल्या किती हे समजणं कठीण आहे.

एकूण 457 जातकं आहेत. 'जातक' याचा गोळाबेरीज अर्थ 'जन्म' असा होतो. प्रत्येक जातकात एक किंवा एकाहून अधिक कथा आहेत.

प्रत्येक कथेत काही ना काही नीतीपाठ आहे. जातकातील गोष्टींमुळे आपल्याला जीवनाचा अर्थ अधिक चांगला समजतो. चांगल्या तऱ्हेने जगावे कसे हेही आपण समजू शकतो. गर्व, हाव आणि दुर्गुण यांच्या निरर्थकतेवर जातक कथांतून भर दिला आहे. कारण मानवी दुःखाच्या प्रमुख कारणांपैकी ती आहेत.

एका मूर्ख साधूची ही कथा पाहू. त्याच्या अंगावरील भगव्या वस्त्रांमुळे आणि त्याला असलेल्या लांबलचक दाढीमुळे लोक त्याच्याबद्दल आदर दाखवीत. त्यामुळे साधू गर्वाने फुगला.

एके दिवशी तो एका खेड्यातून चालला होता. दोन एडक्यांची चाललेली झुंज पाहण्यासाठी एका ठिकाणी खूप गर्दी जमली होती. साधू एका दगडी चौथऱ्यावर बसला. आणि लोकांचं लक्ष वेधण्यासाठी उगीचच तो खाकरला.

दुर्दैवाने, लोकांनी त्याला पाहायच्या अगोदर एकमेकांशी टक्करणाऱ्या एडक्यांपैकी एकाने त्याला पाहिलं. एडक्याला साधूबद्दल काय वाटलं कुणास ठाऊक, पण एकूण साधूचे दर्शन त्याला आवडले नसावे. तो सरळ साधूच्या दिशेने चालून आला.

कुणालाही टक्कर देण्यापूर्वी आपलं डोकं खाली करण्याची एडक्याची पद्धतच असते. त्याप्रमाणे चालून येणाऱ्या एडक्याने साधूच्या दिशेने येत असतानाच आपलं मुंडकं खाली केलं होतं. साधूला वाटलं माणसासारखा एड-काही आपल्याला पाहून नतमस्तक झाला आहे. अभिमानाने त्याची मान ताठ झाली. 'दूर व्हा, दूर व्हा' असं लोक ओरडत असताही साधूने त्यांच्या ओरडण्याकडे दुर्लक्ष केलं. उलट त्या एडक्याला आशीर्वाद देण्यासाठी त्याने आपला उजवा हात वर उचलला. दुसऱ्या क्षणी एडक्याने त्याला ढुशी दिली आणि त्याला सरळ जमिनीवर पाडलं.

हावरटपणाचं फळ तर याहून भयानक असतं– हे आपल्याला पुढील कथेत पहायला सापडेल:

एका तरुणाला, तो या ठिकाणाहून त्या ठिकाणी भटकत असता एक अशिक्षित खेडूत भेटला. त्या खेडूताला मंत्रविद्या अवगत होती. दररोज तो खेडूत रानात जाई, आंब्याच्या एका झाडाखाली उभा राही, आणि मंत्रोच्चार करी. अकस्मात ते झाड आंब्यांनी लगडून जाई. दुसऱ्या क्षणी ते आंबे पिकत. आणि आपोआप जमिनीवर पडत.



तो खेडूत ते आंबे गोळा करी. काही स्वत: खाई. उरलेले सर्व त्याच्या आजूबाजूला राहाणाऱ्या गरीब शेजाऱ्यांना वाटून टाकी.

तो खेडूत कनिष्ठ जातीचा असूनही त्या तरुणाने त्याचे पाय धरले आणि तो मंत्र मला शिकव अशी त्याच्याजवळ याचना केली. त्या माणसानं कसंतरी हो म्हटलं. परंतु त्याचवेळी त्या तरुणाला बजावलं तुझ्या स्वत:साठी, मी शिकवणार असलेला मंत्र कधीही वापरू नकोस. तू जोपर्यंत खोटं बोलणार



नाहीस तोपर्यंतच हा मंत्र तुझ्या कामी येईल."

त्या खेडूताकडून मंत्र शिकून तो तरुण स्वतःच्या गावी परतला. दिवसातून अनेक वेळा त्याने तो मंत्र म्हणण्यास सुरुवात केली. मंत्रोच्चारानुसार त्याला रसाळ आंब्याचे ढीगच्या ढीग मिळू लागले. ते आंबे तो बाजारात विकू लागला. लवकरच तो श्रीमंत बनला.

त्या ठिकाणच्या राजाने ही अद्‌भुत वार्ता ऐकली. त्याने त्या तरुणाला बोलावले आणि विचारले, "हा मंत्र तू कुठे शिकलास ?" आपण एका कनिष्ठ जातीच्या खेडूताकडून हा मंत्र शिकलो हे त्या तरुणाला सांगावसं वाटेना. केवळ फुशारकी मारायची म्हणून तो उद्‌गारला—"महाराज दूर देशातल्या एका विद्यापीठात, काही पंडितांच्या मार्गदर्शनाखाली मी खूप विद्यार्जन केलं, त्यावेळी मी हा मंत्र शिकलो."

"ठीक आहे. आमच्या समोर त्या मंत्राचा पडताळा आणून दाखव." राजाने आज्ञा केली.

राजाच्या राखीव उद्यानात त्या तरुणामागोमाग, राजा, राजघराण्यातील इतर सर्व मंडळी, अनेक मंत्रीगण आणि अधिकाऱ्यांचा ताफा इत्यादी लोक गेले. त्या तरुणाने एक डेरेदार आम्रवृक्ष पसंत केला. आणि आपला मंत्र म्हटला. परंतु काहीही घडलं नाही. कारण तो खोटं बोलला होता.

सर्वांच्या कुचेष्टेचा विषय झालेल्या त्या तरुणाने अखेरीस राजाला सत्य सांगितले. राजा म्हणाला, "पोकळ गर्वाच्या आहारी जाऊन तू आपल्या गुरुची प्रतारणा केलीस. जा गुरुची क्षमा माग. कदाचित् तुला पुन्हा मंत्रसामर्थ्य प्राप्त होईल"

तरुणाने राजाच्या सांगण्याप्रमाणे केले. परंतु पुन्हा काही त्याला त्या मंत्राचा पडताळा आला नाही. कारण स्वतःच्या स्वार्थासाठी त्याने मंत्राचा उपयोग केला होता.

यासारख्या अनेक नीतिप्रद गोष्टी जातक कथांच्या पानोपानी आहेत.

# अर्थशास्त्र

राजकुलात जन्मलेल्या एका तरुणाचा त्या देशाच्या राजाने विलक्षण अपमान केला. त्या अपमानाचा कसा सूड उगवावा या विचारात मढलेला तो तरुण एकाकी, निर्जन अशा रस्त्याने चालला होता. तेव्हा त्याच्या दृष्टीला एक चमत्कारिक गोष्ट पडली. एक म्हातारा मनुष्य रागारागाने आपल्या हातातील रस जमिनीवरच्या काटेरी झुडुपांवर ओतत होता.

"आजोबा, तुम्ही काय करत आहात ?" त्या तरुणाने विचारले "या झुडुपातला एक काटा माझ्या पायात घुसला. म्हणून मला या सगळ्या झुडुपांचा नाश करायचा आहे. मी त्यांच्या मुळावर गोड रस टाकतो आहे. या ठिकाणी लवकरच लाखो मुंग्या जमतील. झुडुपांची पाळंमुळं त्या खाऊन टाकतील आणि झुडुपांचा आपोआप नाश होईल."

त्या वृद्धाची बुद्धिमत्ता आणि कृतनिश्चय पाहून त्या तरुणाला विस्मय वाटला. राजाचा सूड घेण्याच्या आपल्या मनोदयात हा वृद्ध आपल्याला नक्की मार्गदर्शन करू शकेल अशी त्याला खात्री वाटू लागली.

त्या तरुणाचं नाव चंद्रगुप्त होतं. त्या वृद्धाचं नाव चाणक्य होतं. 'मलां मार्गदर्शनं करा' अशी चंद्रगुप्ताने चाणक्याला विनंति केली. चाणक्याने ते मान्य केले. कारण त्याच्या मनातही पूर्वीपासून त्या राजाबद्दल राग होता.

चाणक्याच्या मार्गदर्शनामुळे लवकरच चंद्रगुप्त, त्यावेळी मगधावर राज्य करणाऱ्या नंद राजाला पदच्युत करण्यात यशस्वी झाला. आणि तो स्वतः

मगध सम्राट बनला .मौर्य घराण्याची सत्ता त्याच्या काळापासूनच चालू झाली.

चंद्रगुप्त – चाणक्याच्या पहिल्या भेटीची कथा कदाचित् खरी नसेलही. परंतु या कथेच्या लोकप्रियतेवरून चाणक्याबद्दल लोकांची काय भावना होती ते समजतं.

चाणक्यालाच कौटिल्य या नावाने ओळखतात. पुष्कळ लोकांची अशी समजूत आहे की कौटिल्य म्हणजे जो 'कुटिल' (राजकारणी) आहे तो. पण कदाचित् तो शब्द 'कौटिल्य' ऐवजी 'कौटल्य' असावा. कौटल्य हे एका प्राचीन ऋषींचे नाव आहे. चाणक्य ज्या कुलात जन्मला त्या कुलाचा कदाचित् तो मूळ पुरुष असावा.

अतिशय हुशार आणि तर्कनिष्ठ अशी जी चाणक्याची ख्याती झाली आहे ती त्याने लिहीलेल्या पुस्तकामुळे झाली आहे. त्या पुस्तकाचे नाव 'अर्थशास्त्रम' आहे. प्राचीन भारतीय विद्वत्ता केवळ आध्यात्मिक चर्चा, तत्त्वज्ञान, कल्पना रम्यता आणि काव्य यामध्येच गुंतलेली नव्हती हे या पुस्तकामुळे सिद्ध होते. जीवनाच्या सर्व अंगोपांगांचा विचार त्यामधे आहे. पुराण कालातच 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ लिहीला गेला. राज्यशास्त्र, समाजशास्त्र, कायदा आणि अर्थशास्त्र यावरील ग्रंथ म्हणजे चाणक्याचे 'अर्थशास्त्र' होय.

चाणक्यापूर्वीच्या पंडितांनी या विषयांसंबंधी जे शास्त्र आणि सिद्धान्त मांडले होते त्या सर्वांचा चाणक्याने सखोल अभ्यास केला. राजपुत्र आणि अधिकारी वर्ग त्या विषयांचं शास्त्र आणि सिद्धान्त यांचा अभ्यास करण्याची तोषिस घेणार नाहीत हे त्याला माहीत होतं. म्हणून आपल्या पुस्तकात त्याने मोठमोठ्या जाणकारांनी त्या विषयात काय म्हटले अगर लिहीले आहे ते अगदी थोडक्यात साररूपात दिले आहे आणि जाता जाता त्याबद्दलची आपली मतेही मांडली आहेत.

काही टीकाकारांनी चाणक्याला दुष्ट, वाईट, कपटी म्हटले आहे कारण स्वत:च्या शत्रूंचा नाश करण्यासाठी लबाडी व धूर्तपणा करण्यास हरकत नाही

असे त्याने उघडपणे म्हटले आहे. राजपुत्र, राजनीतीज्ञ आणि शासक यांच्या-करता त्याने आपले पुस्तक लिहीले आहे. त्या काळी एका राजाने दुसऱ्याशी कपटाने वागणे ही प्रथा सर्वत्र रूढ होती. कोणत्या परिस्थितीत कपटनीतीचा अवलंब करावा, कोणत्या परिस्थितीत कपटनीती आचरू नये याचे नुसते दिग्दर्शन चाणक्याने केले आहे.


राज्यकारभारासाठी प्रचलित असलेली परंतु जी सर्वस्वी अहितकारक आहेत अशी कितीतरी जुनी तत्त्वे चाणक्याने बाद केली आहेत. हे एक उदा-



हरण पहाः त्या काळी राजसत्ता हस्तगत करण्यासाठी राजपुत्र आपल्या पित्याचा सर्रास वध करीत. त्यापूर्वी राजाला सल्लामसलत देणाऱ्यांनी ही प्रथा टाळण्याचे अनेक उपाय सुचविले आहेत. राजधानीपासून दूर असलेल्या किल्ल्यात राजपुत्रांना बंदिवासात टाकावं असा काहींनी सल्ला दिला आहे. इतर काहींनी म्हटलं आहे की राजपुत्रांना राजाची भयंकर भीती वाटेल असं करीत राहावं.

चाणक्याने राजपंडितांची ही सर्व मते आपल्या ग्रंथात सांगितली आहेत. परंतु त्यावद्दल म्हटले आहे की हे कोणतेच उपाय योग्य नाहीत. राजपुत्रांनी राजपदासाठी राजाचा वध करायची प्रथा जर बंद व्हावी असे वाटत असेल तर त्या राजपुत्रांना चांगल्या गुरुच्या देखरेखीखाली शिक्षण देणं हा सर्वात उत्तम उपाय आहे.

अशा प्रकारे 'अर्थशास्त्र' म्हणजे वास्तववादी सल्ला आणि तर्कशुद्ध व्यावहारिक समज यावरील पुस्तक होय.



BVBK-0401163

## या मालेची प्रकाशित पुस्तके

| | |
|---|---|
| बापू (चित्रमय जीवन–दोन भागांत विभागून) | एफ. सी. फ्रीटास |
| काश्मीर | छायाचित्रकार : प्रेमानंद शर्मा<br>लेखिका : माला सिंह |
| पक्षी–जगत | जमाल आरा |
| आमच्या नद्यांची कहाणी | लीला मजुमदार |
| हिमालयाच्या शिखरांवर | ब्रिगेडियर ग्यानसिंह |
| स्वर्गाची सहल व अन्य कहाण्या | लीलावती भागवत |
| सुरस कहाण्या | मनोज दास |
| स्वराज्याची कहाणी–भाग १ | विष्णू प्रभाकर |
| आपल्या आगगाड्यांची कहाणी | जगजीत सिंह |
| त्यांनी पाहिलेला भारत | के. सी. खन्ना |
| चला, नाटक करू | उमा आनंद |
| कोणे एके काळी | एम. चोकसी व पी. एम. जोशी |
| मनी मावशीचा परिवार | एम. डी. चतुर्वेदी |
| युगांतरीच्या कथा | शांता रंगाचारी |
| बडा पाणी | लीला मुजुमदार |
| जग बदलले या शोधांनी | मीर नजाबत अली |
| रोहंत आणि नंदिय | कृष्ण चैतन्य |

प्रत्येकी मूल्य रु. १–५०

ही पुस्तके इंग्रजी व इतर सर्व भारतीय भाषांत प्रसिद्ध होणार आहेत.